भावार्थ ज्ञानेश्वरी

(२१ व्या शतकासाठी)

सुलभ ओवीबद्ध रचना

अध्याय सातवा



विजय बळवंत पांढरे B.E. (Civil)

ई-आवृत्ती

साहित्य प्रतिष्ठान®

भावार्थ ज्ञानेश्वरी(२१व्या शतकासाठी)

अध्याय सातवा

मूळ लेखन : संत श्री ज्ञानेश्वर (इ.स. १२९१)

२१व्या शतकातील मराठीत ओवीबद्ध रुपांतर (इ.स. २०१०):

श्री विजय पांढरे

मु पो लाखनवाडा,

ता. खामगांव,

जि बुलढाणा. महाराष्ट्र.

9822992578

vbpandhare@gmail.com

ई प्रकाशन :

ई साहित्य प्रतिष्ठान®

9869674820

esahity@gmailcom

www.esahity.com

E Sahity Pratishthan

Eleventh floor(G1102)

Eternity

Eastern Express Highway

Thane, Maharashtra. 400604

मुखपृष्ठ रचना : श्री जावेद शेख

©श्री विजय पांढरे(२०१२)

या पुस्तकाची प्रिंट स्वरुपातील आवृत्ती मुकुंदराज महाराज संस्थान यांनी प्रकाशित केली असून ती ३९०/- रुपयांना उपलब्ध आहे.

प्रस्तुत ई आवृत्ती ही विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध असून कोणीही आपल्या वेबसाईट्वर डाऊनलोडसाठी विनामूल्य उपलब्ध करण्यास प्रकाशकांची कोणतीही हरकत नाही. या पुस्तकाची ई आवृत्ती प्रत्येक मराठी माणसाच्या डेस्कटॉपवर असावी हे आमचे ध्येय असून त्यासाठी **प्रत्येक मराठी माणसाचे सहकार्य अपेक्षित आहे.**

॥ ज्ञानेश्वरी ई पारायण अभियान ॥

जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथांपैकी श्री ज्ञानेश्वरी हा ग्रंथ आहे. त्यात परमार्थ तर आहेच. पण परमार्थाची खरी सुरूवात मनुष्य जन्म उत्कृष्टपणे जगण्यातून होते. कसे जगावे याचे उत्कृष्ट विवेचन सुंदर रितीने ज्ञानेश्वरीत केले आहे. प्रत्येक मराठी माणसाने वाचलेच पाहिजेत असे ग्रंथ म्हणजे छत्रपती शिवरायांचे चरित्र आणि श्री ज्ञानेश्वरी. पण ज्ञानेश्वरी प्रत्येक मराठी माणूस वाचतोच असे नाही. कारण १२९१ साली प्रचलित असलेल्या प्राकृतबहुल मराठीत लिहीलेली ज्ञानेश्वरी आजच्या तरुणांना समजायला कठीण जाते. अनेकजण प्रयत्न करतात पण नंतर सोडून देतात. कारण प्राकृत भाषा आजच्या तरूणाच्या ओळखीची राहिलेली नाही.

अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठान सादर करीत आहे २१व्या शतकातील सोप्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरी. श्री विजय पांढरे यांनी अत्यंत सोप्या भाषेत आणि २१व्या शतकातील तरुणांना समजेल अशा भाषेत ज्ञानेश्वरीचे केलेले रुपांतर आपल्याला आवडेलच. कारण मूळ ज्ञानेश्वरीतील गोडवा त्यांनी जसाचा तसा जपला आहे. रोज केवळ अर्धा तास, असे फ़क्त एकोणतीस दिवस वाचन करून आपण ज्ञानेश्वरीचे पूर्ण पारायण करू शकता. श्री विजय पांढरे लिखित २१व्या शतकासाठी सध्याच्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरीची भेट आम्ही आज ई साहित्य प्रतिष्ठानच्या व्यासपीठावरून सादर करीत आहोत. ही ज्ञानेश्वरी मूळ ज्ञानेश्वरीप्रमाणेच ओवीबद्ध असून समजायला खूपच सोपी झाली आहे. मूळ प्राकृत ज्ञानेश्वरीइतकीच रसाळ. या ज्ञानेश्वरी सोबत मूळ ज्ञानेश्वरीचीही ई प्रत विनामूल्य उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी व अभियानात सामिल होण्यासाठी खालील लिंक्सना भेट द्या.

www.esahity.com http://www.facebook.com/edyaneshwari
http://edyaneshwari.blogspot.in/ http://youtu.be/yCHZ85Xzuxc

॥ ॐ परमात्मने नमः ॥

अध्याय सातवा

ज्ञानविज्ञानयोग

श्री भगवानुवाच

मग म्हणे तो भगवान । तुज कथिले मी योगज्ञान । म्हणून तू आत्मवान । होशील आता ॥१॥
तू ब्रह्ममयतेस घे जाणून । जैसे तळहाती ते रत्न । तैसे आता सांगेन ज्ञान । विज्ञानासह ॥२॥
उद्‌भव होईल शंकेचा । येथे उपयोग काय विज्ञानाचा । बा तो खुलासा विज्ञानाचा । अनिवार्य अर्जुना ॥३॥
विज्ञान ते जाणले असता । बुद्धि जाईल ती अस्ता । मग जाणणे ती आत्मसत्ता । तेव्हाच होई ॥४॥
बुद्धि ती संपता । नि विचार ते विरता । तर्काची होता सांगता । प्रकटे ज्ञान ॥५॥
अर्जुना जी जाणीव ते ज्ञान । जे जाणले जाते ते विज्ञान । तर्कबुद्धि विचार हे अज्ञान । समजो तुला ॥६॥
सर्व अज्ञान ते हारपता । विज्ञानाची होते सांगता । मग उरे वैश्विक जाणीव जी ब्रह्ममयता । तेचि ज्ञान ॥७॥
ज्ञान ते प्राप्त होता । द्वैताची संपते सत्ता । मी-तूपणाची भेदता । संपून जाई ॥८॥
ऐसे ते गूढ ज्ञान । आता मी तुजला सांगेन । मग होईल निरीच्छ मन । तुझे अर्जुना ॥९॥
हजारात कोणी एकला । प्राप्त होई या ज्ञानाला । जयाच्या त्या धैर्याला । तोड नाही ॥१०॥
अध्यात्माच्या वाटेवरती । लाखो ते चालती । परंतु ती ब्रह्मप्राप्ती । विरळ्यासीच ॥११॥
ही वाट अति कठीण । जीवभाव तो संपू देणं । नि गुण आकारापलीकडं जाणं । सोपे नव्हे ॥१२॥
तैसे श्रद्धेच्या महापुरी । निघतात कोटीवरी । परि प्राप्तीच्या पैलतीरी । विरळा पोहचे ॥१३॥
सोपी नव्हे ब्रह्मप्राप्ती । ती तर जीवभावाची समाप्ती । जे मीपणा संपू देती । ते विरळे ॥१४॥
तरी ऐक तू धनंजया । ही पंचभुते माझी माया । जैसे प्रतिबिंबाची छाया । आरशा माजी ॥१५॥
या प्रकृतीला माया म्हणतात । तिला अंगे आठ असतात । गुण आकार ते प्रकटतात । तियेचे ठायी ॥१६॥
ही अष्टधा प्रकृति कैसी । ऐसा प्रश्न जरी करसी । तेच आता ऐकण्यासी । हो तयार ॥१७॥
आप तेज गगन । पृथ्वी वायू आणि मन । बुद्धि अहंकार मिळून । भाग आठ ॥१८॥
या आठांच्या कारणे । घडे प्रकृतीचे प्रकटणे । तेथे जीवभावांचे भासणे । घडे अर्जुना ॥१९॥
जे जडाते जीववी । चेतनेते चेतवी । मनाकरवी भासवी । शोक मोह ॥२०॥
त्या भासाचे कारणे । मीपणाचे वाटणे । मग इच्छा दुःखाचे वाढणे । आपोआप ॥२१॥
सूक्ष्म जी प्रकृती अव्यक्त । स्थूल होऊन होतसे व्यक्त । मग प्रकटे टाकसाळ अविरत । भूतसृष्टीची ॥२२॥
पंचमहाभूतांकारणे । सकल सृष्टीचे जन्मणे । त्या गुण आकारा कारणे । भिन्नत्व अर्जुना ॥२३॥
चौऱ्यांशी लक्ष योनी । आपल्या ठिकाणी प्रकटवुनी । पंचमहाभूताची कहाणी । नांदे येथे ॥२४॥
ऐसे लक्ष लक्ष प्राणिजात । जन्मती त्या टाकसाळीत । आणि अस्तित्व अविरत । भासे येथे ॥२५॥
आपुल्याच कर्म प्रकृति कारणे । येथे सृष्टीचे होणे जाणे । ते जन्मणे आणि मरणे । ते कर्म अर्जुना ॥२६॥
ही प्रकृति कर्माची कहाणी । सांगितली तुला उघडुनी । नामरूपाची ही उभारणी । प्रकृति कारणे ॥२७॥
तैसे मी आणि प्रकृति प्रकटन । नसेची ते भिन्न । संपूर्ण विश्वाचं होणं जाणं । माझेच ठायी ॥२८॥
शोधता मृगजळाचे मूळ । जे किरण नसती केवळ । ते सूर्यबिंब जे अढळ । तेच मूळ अर्जुना ॥२९॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

ऐसे पहा अर्जुना । जे सृष्टी बनून येते जन्मा । वा घडता प्रलयाची घटना । ते उरे ॥३०॥
ऐसे प्रकटणे आणि लय होणे । ते घडे माझेच कारणे । विश्वाचे ते होणे जाणे । माझेचि ठायी ॥३१॥
सुवर्णाचे मणी केले । ते सोनियाचे सुती ओविले । तैसे मी जग उभारले । माझेच ठायी ॥३२॥
म्हणूनी उदकी जो रस । का पवनी जो स्पर्श । वा चंद्र सूर्यात जो प्रकाश । तो मीच अर्जुना ॥३३॥
पृथ्वीच्या ठायी गंध । तो मीच नैसर्गिक शुद्ध । वा गगनी जो शब्द । तो ओंकार मी ॥३४॥
नराठायी जे नरत्व । जे अहंभावाचे सत्त्व । मीच ते पौरुष तत्त्व । जगती अर्जुना ॥३५॥
वर वर जो अग्नी दिसे । ते नाम तेजाचेच असे । ते दूर करिता सरीसे । निजतेज मी ॥३६॥
येथे नानाविध योनी । जन्म घेती या त्रिभुवनी । तयांची जीवन कहाणी । माझेच ठायी ॥३७॥
काही वाराच पिती । काही गवतावर जगती । काही अन्न खाऊनी रहाती । काही जळामाजी ॥३८॥
ऐसे प्राणिमात्रांचे भिन्नपण । जे प्रकृतीच्याच कारण । त्या सर्वाठायी अभिन्न । मीचि एक ॥३९॥
माझेच ठायी प्रकटती चराचर । जसे गगनाठायी फुटती अंकुर । नि होता प्रलय भयंकर । मीचि होती ॥४०॥
जेव्हा मी विश्वाकार असे । तेधवा विश्वासारखाच भासे । नि महाप्रलय दशे । माझा मीचि ॥४१॥
ऐसे अनादि जे सहज । ते मीच गा विश्वबीज । ते तळहाती तुज । देत असे ॥४२॥
ऐसे हे मूळतत्त्व । जर तू अनुभवशील अंतरंगात । मग होशील तू मुक्त । आपोआप ॥४३॥
परि अप्रासंगिक हे बोलणे । जे विषयांतर होणे । न अनुभवताच बोलणे । चूक अर्जुना ॥४४॥
बळीच्या माजी जे बळ । ते मीच जाण अढळ । बुद्धिमंती जी बुद्धि केवळ । ती मीचि ॥४५॥
भूतांठायी जो काम । तो मीच आत्माराम । जाणणे हा स्वधर्म । तेचि ज्ञान ॥४६॥
इंद्रिय गुणधर्माप्रमाणे । वागणे विकाराच्या कारणे । परि धर्म विरुद्ध न जाणे । होई त्याचे ॥४७॥
अप्रवृतीची सोडून सोबत । आचरत मार्ग शास्त्रविहित । यमनियम मशालीसोबत । चाले तो ॥४८॥
काम ऐसा शिस्तीत येता । करतो धर्माची सहाय्यता । मग कर्मयोग आचरीता । प्रकटे मोक्ष ॥४९॥
धर्माधारित जीवन जगणं । कामही धर्माधारित असणं । मग मोक्ष प्राप्त होणं । आपोआप ॥५०॥
ऐसा शिस्तबद्ध काम तो । जो प्राणिमात्रात रहातो । तो मीच रे असतो । बा अर्जुना ॥५१॥
हे एकेक किती सांगावे । हे विश्वचि आघवे । मजपासोनच जाणावे । उत्पन्न झाले ॥५२॥
जे सात्त्विकभावाचं असणं । वा रजतमादिक गुण । ते मजठायीचेच प्रकटन । जाण अर्जुना ॥५३॥
हे झाले तरी माझ्या ठायी । परि तयामाजी मी नाही । कधी स्वप्नीच्या का डोही । बुडतो कोणी ॥५४॥
वनस्पती अंगी असे रस । त्या रसातून बीज येई उदयास । अंकुर येता बीजास । काष्ठ प्रकटे ॥५५॥
मग त्या काष्ठाच्या ठायी । सांग बीजपण असे का काही । तैसा मी विकारी नाही । जरी दिसे विकारला ॥५६॥
अभ्र उपजे गगनात । परि गगन न समाये अभ्रात । अथवा पाणी असे मेघात । पाण्यात मेघ नाही ॥५७॥
जलतत्त्वाच्या घर्षणाने । आकाशी वीज चमकणे । विजेठायी का घडे असणे । जलाचे कधी ॥५८॥
जसा अग्नीतून धूर प्रकटतो । परि धुरात अग्नी नसतो । तसा मी विकारात नसतो । जरी दिसे विकारला ॥५९॥
शेवाळ बनता पाण्यात । ते पाण्यासी झाकतं । वा अभ्राआड असे लपत । गगन जैसे ॥६०॥
स्वप्न खोटेच असते । तरी झोपेत ते खरे वाटते । जागृती का आठवते । स्वप्नात कधी ॥६१॥
उदाहरण डोळ्याचे देतो । डोळाच मोतीबिंदू बनवतो । नि दृष्टि गिळून टाकतो । आपुलीच ॥६२॥
मज ठायीच जी प्रकटली । त्रिगुणात्मक जी सावली । मजवरीच मी ओढीली । आपैसी जैसे ॥६३॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

म्हणून भुते मज न जाणती। असती मीच परि स्वत:स विसरती। पहा जळी न विरती। मोती जैसे ॥६४॥
मातीपासून घागर ती बनता। तोडता पावे मातीसी एकता। परि अग्नीत ती जाळता। न मिळे मातीसी ॥६५॥
पहा प्राणिजात हे सर्व। जसे माझेच ते अवयव। परि बनले ते जीव। मायायोगे ॥६६॥
सर्व ठिकाणी माझेच ते असणे। परि मीच मला विसरणे। अहंममता भ्रांतीकारणे। घडे ऐसे ॥६७॥
ऐसी माया ही कठीण। कैसी जावी ती तरून। कैसे घडे ब्रह्मासी अनुभवणं। ऐक आता ॥६८॥
द्वैताच्या त्या भासातून। प्रकटे इच्छा वासनांचं जन्मणं। तेच महाभुतांचं प्रकटणं। अस्तित्वा माजी ॥६९॥
वाढे सृष्टीचा विस्तार। जे काळाचेच कलेवर। प्रवृत्ती निवृत्तीचा वावर। काळ आहे ॥७०॥
वृष्टी होता त्रिगुणाची। भरती येते ती मोहाची। मग नगरे यम नियमांची। वाहून जाती ॥७१॥
त्या मायेच्या प्रवाहात। द्वेषाचे भोवरे उठतात। बेहोषी मत्सर प्रकटतात। मच्छीप्रमाणे ॥७२॥
तेथे प्रपंचाची वळणे। कर्माकर्माचे तरंग उठणे। नि सुखदु:खाचे ते तरंगणे। कचऱ्याप्रमाणे ॥७३॥
रतीचिया बेटा। आदळती कामाचिया लाटा। मग जीवभावाच्या वाटा। प्रकटल्या दिसती ॥७४॥
ऐसे अहंकाराचे प्रकटणे। तेथे मदत्रयाचे उकळणे। नि विषयांच्या लाटा उठणे। घडे तेथे ॥७५॥
उदय अस्ताचे ते लोंढे। पाडित जन्ममरणाचे खड्डे। ते पंचभुतांचे बुडबुडे। होती जाती ॥७६॥
संमोह भ्रमाचे मासे। गिळताती धैर्याची आमिषे। अज्ञान भोवरे खासे। प्रकटती तेथे ॥७७॥
भ्रांतीच्या त्या गढूळपणे। आशेच्या गळात फसणे। रजोगुणांचे ते खळाळणे। स्वर्गापर्यंत ॥७८॥
तमाचे प्रवाह वाहती। बेटे सत्त्वाचीही असती। ऐसी तरण्या कठीण ती। माया नदी ॥७९॥
जन्ममरणाचे कोडे। सत्यलोकाही न सोडे। उदय अस्त तो घडे। ब्रह्मादिकांचा ॥८०॥
ऐशा या माया प्रवाहात। जीव न तरू शकतात। मग अखंडपणे भोगतात। जन्ममरण ॥८१॥
येथे एक नवल होय। जो जो करणे उपाय। तो करीतसे अपाय। जीवभावा ॥८२॥
बुध्दिचिया वाटा जाता। सापडेनाच त्यांचा पत्ता। अहंब्रह्मास्मि डोही बुडता। मरती ज्ञानी ॥८३॥
वेदत्रयांचा तराफा बांधणे। त्यावर अहंभावाचे धोंडे ठेवणे। मग मदरुपी मच्छीने गिळणे। आपोआप ॥८४॥
तारुण्याची कास धरणे। मदनाच्या नादी लागणे। मग विषयमगरींनी गिळणे। घडे तेथे ॥८५॥
वृद्धत्वाच्या समयात । ते मतिभ्रंश पावतात। आणि मरणा कवळतात। जिवंतपणी ॥८६॥
शोक कड्यावर आपटले। क्रोध भवऱ्यात सापडले। आपत्ती गिधाडांनी तोडले। लचके त्यांचे ॥८७॥
ऐसे दु:खाने ते बोंबलती। मरण चिखली अडकती। जे वासने नादी लागती। ते मरती अर्जुना ॥८८॥
एक यज्ञ यजन करती। ते नच मायानदी तरती। स्वर्ग कपारीत ते अडकती। माया नदीच्या ॥८९॥
एक मोक्ष आशा धरती। परि कर्मातच अडकती। विधि-निषेधातच फिरती। जन्मोजन्मी ॥९०॥
वैराग्य न प्राप्त होता। विवेक तो न प्रकटता। काहीही ते करता। अपायचि घडे ॥९१॥
स्वसामर्थ्याने उडणे। ही मायानदी तरणे। कधी होईल ते घडणे। ऐक आता ॥९२॥
पथ्य न पाळता बरे होणे। साधुसी दुष्ट बुद्धी कळणे। धनवंताने भोग न भोगणे। घडे का कधी ॥९३॥
का न्यायाधीशा चोराने दाटले । मच्छीने गळच गिळले। भित्र्याने समंधा का घाबरवले। कधी अर्जुना ॥९४॥
हरिण पाडस जाळे तोडील। वा मुंगी जर मेरु ओलांडील। तरच मायानदी तरेल। जीव अर्जुना ॥९५॥
दगड का पाण्यात तरंगतो। लंपट का कधी स्त्रीस जिंकतो। तैसा जीव न ओलांडतो। ही मायानदी ॥९६॥
येथे एकचि तरला। जो मन इच्छांसी तुटला। तोच बा मग गेला। पैलतीरी ॥९७॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

जया सद्गुरु भेटले । जयाच्या मनाचे मनपण विरले । तयानेच अंतरंगी जाणले । ते आत्मतत्त्व ॥९८॥
संकल्पांचे ओझे सांडणे । विकल्पांच्या झुळका चुकवणे । अनासक्त ते होणे । रहस्य अर्जुना ॥९९॥
जे लागले अवधानाच्या उतारा । बोधाचा जोडून तो तारा । तेच निवृत्तीच्या पैलतीरा । निघाले गा ॥१००॥
जे निवृत्ति हातांनी पाणी काटती । अवधानी रत रहाती । तेच मग पोहचती । पैलतीरा ॥१०१॥
ऐसे जयांनी इच्छेस सांडले । मनाचे मनपण विरले । अवधानी तयांनीच बा जाणले । ते आत्मतत्त्व ॥१०२॥
ज्यांना हे रहस्य न कळले । तया अंगी अहं भूत संचारले । म्हणून ते विसरले । आत्मतत्त्वा ॥१०३॥
तेव्हा अवधानाचे वस्त्र न आठवते । नग्नतेची लाज न वाटते । मग करू नये ते करती ते । बेहोषीत ॥१०४॥
या शरीराच्या गावा । ज्यासाठी आले ते पांडवा । तो कार्यभाग आघवा । विसरले ते ॥१०५॥
मनइंद्रियांत ते अडकून । इच्छा वासनांच्या नादी लागून । इंद्रियलोलुप होऊन । मरतात ते ॥१०६॥
ते दु:ख शोक पावती । परि नाही तयाठायी जाण ती । ऐसे अखंडित ते फिरती । भवचक्री ॥१०७॥
म्हणून ते मजसी चुकले । फक्त ज्ञानीच मज पावले । जयाचे आत्महित झाले । आपोआप ॥१०८॥
पहिला आर्त म्हणणे । दुसऱ्या जिज्ञासू बोलणे । तिसरा अर्थार्थी जाणणे । ज्ञानी चौथा ॥१०९॥
आर्त दु:खाचे कारणे । जिज्ञासूने दर्शन घेण्या भजणे । अर्थार्थी तो स्वार्थकारणे । भजे मजला ॥११०॥
परि चौथ्याच्या ठायी । काहीच मागणे नाही । तोच भक्त एक पाही । ज्ञानिया माझा ॥१११॥
त्या ज्ञानाचेनि प्रकाशे । फिटले द्वैताचे ते कवडसे । मग मीच जाहला अनायासे । तो ज्ञानी माझा ॥११२॥
द्वैताची झाली आटणी । अद्वैताच्या ठिकाणी । तैसे आम्ही दोन्ही । एकरूप अर्जुना ॥११३॥
जैसा वारा गगनी विरे । मग वारेपण वेगळे न उरे । तैसा तो आणि मी एक रे । जाण अर्जुना ॥११४॥
जरी वारा हलवुनी पाहिजे । तरी गगना वेगळा देखिजे । एरवी गगन ते सहजे । असे जैसे ॥११५॥
तैसे देहकर्माकारण । तो वेगळा असे भासणं । परि तो आणि मी जाण । एकचि अर्जुना ॥११६॥
आत्मज्ञानाच्या कारणे । मी आत्मा ऐसे तो जाणे । तयाचे नि माझे एक असणे । तेचि ज्ञान ॥११७॥
जो जीवभावातून सुटला । आणि आत्मतत्त्वी पावला । तो कधी का वेगळा राहिला । देहपणे ॥११८॥
म्हणून आपुलीया कारणे । पहिल्या तिघांचे झोंबणे । परि जेणे मजसी एकरूप होणे । तो भक्त ज्ञानी ॥११९॥
दुधाच्या त्या आशेनं । गायीस दोरीनं बांधणं । परि वासरा दूध ते भेटणं । गाय बांधल्यावीण ॥१२०॥
तन-मन प्राणाने । त्या गायीसच वासराने प्रेम करणे । त्या गायीस ते म्हणे । ही माय माझी ॥१२१॥
त्या अनन्यभावाकारणे । गायीनेही तैसेच प्रेम करणे । तैसेच हे बोलणे । भगवंताचे ॥१२२॥
मग भगवंते म्हणितले । जे पहिले तीन मी सांगितले । तेही आवडती बघ भले । परि धन्य ज्ञानी ॥१२३॥
जो जाणोनिया मजसी । एक झाला माझेशी । जैसे येऊन मिळता सागरासी । न परते नदी ॥१२४॥
तैसा आपुल्या अंत:करणी । जो एकरूप झाला मज ठिकाणी । मग तो मी ही विभागणी । न उरे तेथे ॥१२५॥
ज्ञानिया जो म्हणिजे । तो चैतन्याचि केवळ माझे । हे म्हणू नये परि काय कीजे । न बोलावे किती ॥१२६॥
विषयांच्या वनातून । कामक्रोधाचे सापळे चुकवून । कुशल कर्माच्या वाटेनं । सटकतो तो ॥१२७॥
मग ज्ञानियाचे संगे । त्या सत्कर्माचे मार्गे । अपप्रवृत्तीच्या त्यागे । चालतसे तो ॥१२८॥
मग शेकडो जन्मात । कर्मफले त्यागत । मन इच्छा सोडत । तो मुक्त होई ॥१२९॥
शरीर ते धारण करणं । ते पाप तयाच्या दृष्टीनं । मग कर्मक्षय तो होणं । समज येता ॥१३०॥
गुरुकृपेची पहाट होता । अंतरात ज्ञान प्रकटता । आत्मतत्त्वी एकत्वाची वार्ता । प्रकटे अंतरंगी ॥१३१॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

जयाकडे तो पाहतो । मग तो मीच असतो । निवांत जरी राहतो । तरी मीच तेथे ॥१३२॥
विश्वी मीच राही । तो सर्वत्र मलाच पाही । जसे आत बाहेर डोही । बुडला घट ॥१३३॥
तसा तो राहे माझ्यात । आणि मी त्याच्यात । पण ही अनुभूती शब्दात । येत नाही ॥१३४॥
ऐसा स्वयेचि आत्मतत्त्व तो । सर्वत्र आत्मतत्त्वच पहातो । मग विश्वच होऊन रहातो । या संसारी ॥१३५॥
विश्व आत्मतत्त्वच समस्त । ऐसे आले जयाच्या अनुभूतीत । तोच श्रेष्ठ सर्वांत । ज्ञानी माझा ॥१३६॥
जयाच्या त्या अंतरी ती । विश्व एकात्मतेची अनुभूती । तो दुर्लभ या जगती । जाण अर्जुना ॥१३७॥
बाकी बहुत भक्त असती । जया मनी भोग आसक्ती । आशा इच्छाकारणे असती । विषयांध ते ॥१३८॥
फळाचिया आशेने । मनी इच्छांचे प्रवेशणे । मग आपोआप ते लोपणे । ज्ञानाचे घडे ॥१३९॥
ऐसे अंतर्बाह्य अंधारी पडले । म्हणून स्वत:शीच विसरले । मग तयानी अनुसरले । इतर देवतांना ॥१४०॥
आधीच अहंपणाचा भास । त्यात विषयांचे होती दास । करती देवतांची भक्ती खास । अज्ञानाकारणे ॥१४१॥
काय तयांची नियमबुद्धि । कैसी तयाची उपचारसमृद्धि । वस्तू अर्पण करती यथाविधी । स्वार्थाकारणे ॥१४२॥
देवता अनेक कल्पून । अज्ञानी करती भजन पूजन । परि तयांच्याही इच्छा पूर्ण । करतो मीच ॥१४३॥
विविध देवतां तो माने । मज आत्मतत्त्वा न जाणे । स्वार्थ बुद्धिने ते भजणे । त्याचे अर्जुना ॥१४४॥
मग फलप्राप्तीच्या इच्छेने । तयाचे ते आराधने । मग आराधनेचे ते चालणे । फलप्राप्ती पावेतो ॥१४५॥
तयाने जे जे इच्छावे । मग तयासीच पावावे । परि सकळ ते आघवे । माझे कारणेच ॥१४६॥
ते भक्त मजसी न जाणती । जे इच्छेबाहेर न निघती । म्हणून इच्छित फळच पावती । नाशवान ॥१४७॥
किंबहुना ऐसे भजन । ते भवचक्राचेच साधन । जैसे निद्रेतील ते स्वप्न । क्षणिक अर्जुना ॥१४८॥
ऐसे घालती ते साकडे । तयांना द्वैत आवडे । मग प्राप्त होती ते वेडे । नाशवंत फला ॥१४९॥
परि जे निष्काम असती । ते मज निर्गुणास भजती । आणि तयाच्या देहांती । मीच होती ॥१५०॥
जे निष्काम नसतात । ते आपलेच अहित करतात । तळहातावरच्या पाण्यात पोहतात । भ्रमित जसे ॥१५१॥
अमृत सागरी बुडावे । नि ओठ घट्ट आवळावे । आणि जसे मनी इच्छावे । डबक्यातील पाणी ॥१५२॥
हे ऐसे का करावे । अमृती का तयांनी मरावे । अमृतच का न व्हावे । अमृती त्यांनी ॥१५३॥
सोडून मन इच्छेच्या बंधना । का न व्हावे एकरूप चिद्‌गगना । तेधवाच घडे पावणे ज्ञाना । आपोआप ॥१५४॥
गगनी एकरूप व्हावे । आत्मसुख प्राप्त करावे । आपणच ते आत्मतत्त्व व्हावे । हे सूत्र अर्जुना ॥१५५॥
त्या मापरहिता का मापावे । अव्यक्ता का व्यक्त मानावे । सिद्ध असता का शिणावे । साधनेमाजी ॥१५६॥
हा उपदेश आमुचा । जरी असे तो हिताचा । परि जिवा न वाटे कल्याणाचा । अज्ञानाकारणे ॥१५७॥
डोळ्यात द्वैताचा बिंदूमोती । तयाने आंधळे ते जाहले असती । म्हणून माझी ती प्रचीती । नाही त्यांना ॥१५८॥
एरवी मी नसे ऐसे । काही वस्तुजात का असे । अर्जुना का कधी जल रसे । रहित आहे ॥१५९॥
पवन कोणास स्पर्श न करी । आकाश कोणा न घेरी । तसा मीच असे सर्वदुरी । विश्वी अर्जुना ॥१६०॥
प्राणी झाले जे भूतकाळाते । ते सर्व मीच होते । आणि असती जे वर्तमानाते । ते मीच अर्जुना ॥१६१॥
प्राणी होतील जे भविष्यकाळी । ते नसतील मजवेगळी । बघ सृष्टी ही सगळी । मीच अर्जुना ॥१६२॥
अंधारी दोरीच्या सापास । काळा तांबडा न म्हणता येई खास । तैसे हा सृष्टीचा आभास । मिथ्या अर्जुना ॥१६३॥
ऐसा मी पंडुसता । सर्वत्र घनदाट भरलो असता । जी भासते सृष्टीची भासमानता । तो भ्रमच की ॥१६४॥
थोडीशी तीच आता । मी तुला सांगतो वार्ता । अहंकाराचे शरीरावर प्रेम बसता । अनर्थ घडे ॥१६५॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

त्या दोघांच्या पोटी कन्या इच्छा जन्मते । ती तारुण्यात येते । मग लग्न तिचे होते । द्वेषासोबत ॥१६६॥
तयांच्या पोटी जन्मतो । पुत्र द्वंद्वमोह तो । तयासी आजोबा वाढवतो । अहंकार ॥१६७॥
तो जन्मभर भ्रमून । यम नियमा टाकून । आशा तृष्णेत गुंतून । राही सदा ॥१६८॥
अतृप्तीची मदिरा पिऊन । बेहोष ते होऊन । विषयांच्या नादी लागून । राहू लागे ॥१६९॥
ऐसे चित्त अशुद्ध होणं । आशा इच्छांच्या कारण । मग कुकर्मी वर्तन । घडे तेथे ॥१७०॥
जीव भ्रांती घेऊनी मनी । भवचक्री अडकती प्राणी । मग महादु:खाची दाटणी । आपोआप ॥१७१॥
ऐसे दु:ख अनुभवता । येऊ लागते मग सजगता । मग मतीभ्रमाची सांगता । होऊ लागे ॥१७२॥
मग एकनिष्ठ होऊन । देता विकल्प ते सोडून । आणि महापातकाचे वनातून । बाहेर येती ॥१७३॥
ऐसे पुण्य प्राप्त होता । पावूनी मजसी एकरूपता । मग विकारांच्या हाता । न सापडती ते ॥१७४॥
ऐसे सजग जे झाले । जन्ममरणा कंटाळले । तयांनीच फळ चाखले । ब्रह्ममयतेचे ॥१७५॥
मनी समज येता । परब्रह्म येते हाता । अनुभवून ती ब्रह्ममयता । ते पूर्ण होती ॥१७६॥
ते वेळी कृतकृत्य होऊन । अनुभवून अध्यात्माचे नवलपण । संपे कर्माचं रहाटणं । त्यांचेठायी ॥१७७॥
ऐसी ब्रह्ममयतेची प्राप्ती । तयासीच अध्यात्म म्हणती । सर्व कामना त्या विरती । ज्ञान होता ॥१७८॥
अंतरी अद्वैत अनुभवता । प्रकटते ती विश्वात्मकता । मग तेथे ती द्वैतता । उरेचना ॥१७९॥
जिही अधिभुता माते । धरुनी अनुभवाचेही हाते । मग त्या अधिदैवाते । शिवतले गा ॥१८०॥
कास धरता मनाची । ओळख होते अधियज्ञाची । मग वेळ येता मरणाची । न होते दु:ख ॥१८१॥
अर्जुना त्या मृत्युसमयात । जीव होत असे भयभीत । मरणाऱ्या त्या मनात । उपजते भय ॥१८२॥
परि जे मजसी एकरूप झाले । तया ते भयच न उपजले । मृत्यूसमयी न सांडीतले । जयांनी मजला ॥१८३॥
ऐसे जे भाग्यवान । मरणसमयी जे ध्यानवान । ते मजसी एकत्व पावून । अमर होती ॥१८४॥
होत असता ही अमृतवाणी । कमी पडला अर्जुन अवधानी । असजग होता त्या क्षणी । अर्जुन तेथे ॥१८५॥
त्या वाक्यात होते ब्रह्मप्रतिपादन । फळे भरली जैसी रसानं । भावसुंगधाचं ते असणं । चोहीकडे ॥१८६॥
मंद वायू कृष्णकृपेचा । नि वर्षाव कृष्णवचनांचा । अर्जुनासाठी क्षण भाग्याचा । होता तेथे ॥१८७॥
अध्यात्म रहस्य वचने । सांगितली भगवंताने । जी भरली होती ब्रह्मरसाने । ओतप्रत ॥१८८॥
भाग्य उजडले अर्जुनाचे । डोहाळे लागले ज्ञानाचे । करू लागला सेवन अमृताचे । तो तेथे ॥१८९॥
प्राप्त होऊन त्या सुखाला । तो दावी स्वर्गासी वाकुल्या । हृदयी त्याच्या गुदगुल्या । होऊ लागल्या ॥१९०॥
ऐकून शब्द भगवंताचे । उचंबळले मन अर्जुनाचे । नि करण्या सेवन ब्रह्मरसाचे । आतुर झाला ॥१९१॥
मग अनुमानाचे करतळे । घेऊनि ती वाक्य फळे । प्रतिती मुखी बळे बळे । घालू पाहे ॥१९२॥
परि विचारांना ते समजेना । तर्काला ते उमजेना । नि बुद्धिसी ते कळेना । प्रयत्न करता ॥१९३॥
मग मनाशीच म्हणे । ही तर जलातील तारांगणे । कैसा फसविलो येणे । शब्दामाजी ॥१९४॥
कैसी वचने सांगितली । जशी गगनाची घडी घातली । मजसी न ती आकळली । जाणू जाता ॥१९५॥
कैसे जाणावे हे वचन । ऐसा विचार तो करून । मग पाहील अर्जुनानं । भगवंताकडे ॥१९६॥
मग म्हणाला अर्जुन । तू जी सांगितली वचन । ती झालीच नाही ग्रहण । मजला देवा ॥१९७॥
एरवी अवधानाचेच कारणे । होते जयांचे उमजणे । ते ज्ञान कधी श्रवणाने । होईल का ? ॥१९८॥
ऐकून तुझे शब्दवचन । आणि अक्षर मेळावा पाहून । आश्चर्यचकित झाले मन । माझे देवा ॥१९९॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

शब्द जरी ऐकले । परि अर्थ हाता न आले । मजला न उमजले । ब्रह्म देवा ॥२००॥
मी आतुर ते जाणण्याला । म्हणून न दवडता वेळेला । कर सुरवात निरुपणाला । देवा आता ॥२०१॥
ध्यानी ठेवून मागील वचन । ऐकण्या पुढील दक्ष होऊन । विनवणी करता जाहला अर्जुन । देवासी पहा ॥२०२॥
पहा अर्जुनाचे शहाणपण । मर्यादा ती न सोडून । विचारतसे तो प्रश्न । भगवंतासी ॥२०३॥
असे सावध होऊन । विचारावा गुरुसी प्रश्न । मग शिष्याचे ते कल्याण । आपोआप ॥२०४॥
आता प्रश्न करील अर्जुन । आणि देईल उत्तर भगवान । तेच संजय तो सांगेन । धृतराष्ट्रासी ॥२०५॥
आता अवधान ते द्यावे । सार समजूनी घ्यावे । जैसे ऐकण्याआधी पहावे । दृष्टीने अर्जुना ॥२०६॥
बुद्धिच्या जीभेने । शब्द अर्थाचा गाभा कळणे । तैसे सर्वेंद्रिया अवधाने । घडे ज्ञान ॥२०७॥
कळी फुलता फुलाची । अनुभूती नाका सुगंधाची । आणि तृप्ती ती डोळ्यांची । होते तेथे ॥२०८॥
तैसे तळमळ असता मनी । अवधानाची गुढी उभारुनी । ज्ञानाच्या त्या अंगणी । जाणे होते ॥२०९॥
ऐसी इंद्रियातीत स्थिती । जेथे शब्द संपूनी जाती । ऐकावी त्या आत्मतत्त्वाची महती । म्हणे ज्ञानदेव ॥२१०॥

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे ज्ञानविज्ञानयोगोनाम सप्तमोऽध्याय: ॥७॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

॥जेथे जेथे मराठी माणूस, तेथे तेथे ज्ञानेश्वरी॥

सर्वत्र वेद यज्ञाचा घाट।अन् सुविद्येचा झडझडाट । वारा सत्वगुणाचा सोसाट। वाहू लागे॥

अशी सुसाट सुगंधी वार्‌यासारखी ज्ञानेश्वरी सर्वत्र पसरवावी. जगातील प्रत्येक मराठी माणसाने त्याचा आनंद घ्यावा व अवघे जन सुखी व्हावे अशी ज्वलंत आणि तीव्र ईच्छाशक्ती असणार्‌या सर्व वयाच्या वाचकांनी आमच्याशी संपर्क साधावा. आपण जर अजून एकापर्यंत ही ज्ञानेश्वरी पोहोचवू शकत असलात तरी ते एक महत्त्वाचे काम होईल. सहस्त्र बाहू, लक्ष मने या कार्यात लागले तर हा गोवर्धन सहज उचलू शकतील. आपल्या संपर्कात काही प्रसार माध्यम असेल तर हे काम अधिकच सोपे होईल. आपल्या हाती जे असेल ते साधन वापरून आपण या ज्ञानियांच्या राजाच्या ज्ञानानुभवाचा प्रसार करूया.

ज्ञानेश्वर माऊलींचा संदेश सर्व जगात सुगंधासारखा पसरो आणि सर्व जीव सुखी होवोत अशी प्रार्थना करून या कामाला सुरूवात करूया.

सामिल होण्यासाठी लिहा : esahity@gmail.com

संपूर्ण ज्ञानेश्वरीसाठी भेट द्या : www.esahity.com

Facebook वर पहा : http://www.facebook.com/edyaneshwari

ब्लॉगला भेट द्या : http://edyaneshwari.blogspot.in/

या शिवाय या ज्ञानेश्वरीचे तीस तासांचे सांगीतिक पारायण उपलब्ध असून कोणाला FM Radio किंवा तत्सम प्रसार माध्यमासाठी हवे असल्यास संपर्क साधावा. हे सांगितिक ई पारायण लवकरच स्वरनेटाक्षरी या ई साहित्य प्रतिष्ठानच्या ऑडिओ वेबसाईटवर उपलब्ध होईल.

ई मेल द्वारे दर गुरूवारी एक एक भाग ई साहित्य प्रतिष्ठानच्या सव्वा लाख वाचकांना उपलब्ध केला जाणार आहेच. त्यांच्या मार्फ़त ही ज्ञानेश्वरी किमान बारा लाख मराठी माणसांपर्यंत जाणार हे तर निश्चितच.

जगातील बारा कोटी मराठी मनांपर्यंत ती पोहोचावी ! या ज्ञानयज्ञात आपण सहभागी व्हाल ना!

अध्यात्म विषयाचे सखोल मनन, चिंतन व मंथन करून वेशाने साधू नसलेले, पण वृत्तीने साधू असलेले ज्यांच्यावर मी खूप खूप प्रेम करतो, असे श्री विजयजी पांढरे. विजयजी यांनी 'समग्र ज्ञानेश्वर' अगदी सरळ मराठी भाषेत यावेत यासाठी दिनरजनी अथक प्रयास केला आहे. प्रथम त्यांनी 'अमृतानुभव' अगदी सोप्या व सरळ मराठीत ओवीबद्ध केला, नंतर 'चांगदेव पासष्टी' त्याचबरोबर आता श्री ज्ञानेश्वरीसारखा विशाल व ९०३४ ओव्यांनी ओतप्रोत असलेल्या ग्रंथाला ओवीबध्द करुन पूर्ण केले आहे.

श्री. विजयजी यांच्या या पवित्र कार्याचा व विचाराचा भाविकांनी, ज्ञानेश्वरीवर प्रेम करणाऱ्या वारकऱ्यांनी, अभ्यासूंनी खूप आदर करावा. सर्वांना समजेल, सहज कळेल अशी सोपी भाषा त्यांनी ज्ञानेश्वरीवर प्रतिज्ञानेश्वरी रचतांना वापरली आहे. या मागील त्यांचा पवित्र उद्देश हाच आहे, की संत ज्ञानेश्वर महाराजांची ज्ञानेश्वरी सर्व लोकांना कळावी. म्हणून पारंपारिक संकोचित वृत्तीचा परित्याग करून व्यापक विचाराच्या दृष्टीतून या सोप्या भाषेतील ज्ञानेश्वरीकडे सर्व भाविकांनी व वारकरी संप्रदायातील सर्व संतांनी पाहावे अशी मी आशा करतो. विशेष म्हणजे वारकऱ्यासारखा न दिसणारा परंतु हृदयातून पूर्ण वारकरीच असणारा हा तत्त्वचिंतक मी अतिशय जवळून अनुभवलेला आहे. म्हणून त्यांच्या विचाराचा व या आध्यात्मिक कार्याचा खूप आदर करतो . त्यांच्या या कार्याला माझे अनंतानंत शुभ आशीर्वाद. पुन्हा त्यांच्या हातून अशीच वाङ्मयीन सेवा घडत राहो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

परमहितैषी आचार्य स्वामी हरिचैतन्य
गुरुदेव आश्रम, पळसखेड (स.), बुलढाणा

आजच्या मराठी भाषेत ओवीबद्ध झालेली अशी ही ओवीरचना भावार्थ ज्ञानेश्वरीच्या रूपाने प्रकटली आहे ती ईश्वरी कृपाच होय. मनुष्याची बुद्धी हे काम नक्कीच करू शकत नाही. हा भावार्थ वाचताना मनाची पकड तर घेतोच पण वाचता वाचता गोडी अधिकच वाढत जाते व मनाचा वेगळ्या विश्वात प्रवेश होतो. आत्मज्ञानासंबंधीचे सविस्तर निरूपण पुन्हा एकदा सुलभ स्वरूपात जनसामान्यांच्या भाषेत ज्ञानेश्वरीची मूळ गोडी घेऊन प्रकटले आहे.

ह.भ.प.संजय महाराज पाचपोर
गुप्तेश्वर संस्थान, मु.पो.शिर्ला, ता.खामगांव जि.बुलढाणा

'चांगदेव पासष्टी' व 'अमृतानुभव' आणि 'भावार्थ गीता' या दोन ग्रंथांनंतर आता 'भावार्थ ज्ञानेश्वरी' हा ओवीबद्ध ग्रंथ घेऊन श्री.विजय बळवंत पांढरे वाचकांच्या भेटीला येत आहेत. इथे वाचकांच्या भेटीला हा शब्द मी वापरला पण श्री.विजय बळवंत पांढरे यांच्या या लेखनाचा वाचक हा `टाइमपास` करण्यासाठी छापील माकुरावरून नजर फिरवणारा वाचक नव्हे ! याच्या चित्ताला आध्यात्मिक तळमळीचा, ओझरता का होईना स्पर्श झालेला आहे असा हा वाचक आहे. साधनेच्या मार्गावर पाऊल टाकू इच्छिणारा किंवा ज्याने पाऊल टाकले आहे असा हा वाचक आहे. असा वाचक जेव्हा भगवद्गीता, चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी या ग्रंथांवरील लेखन वाचतो तेव्हा त्याचे वाचन ही त्याच्या आंतरिक साधनेची वाटचाल असते. श्री.विजय बळवंत पांढरे ज्ञानेश्वरीचे साधक, अभ्यासक आहेत; पंडित अभ्यासक नव्हेत. त्यामुळे त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाला साधनेचा सुगंध आहे. सर्वसामान्य माणसापर्यंत सुलभीकरणाच्या मार्गाने ज्ञानेश्वरी पोचवण्याचा श्री.विजय बळवंत पांढरे यांचा हा प्रयत्न त्यांच्या हेतूची पूर्तता करणाच्या दृष्टीने यशस्वी ठरेल असा मला विश्वास वाटतो.

कविवर्य मंगेश पांडगावकर,
साईप्रसाद, सायन(प), मुंबई

ज्ञानेश्वरी ही मराठी भाषेत असली, तरी आमच्या मराठी भाषिकाला ती समजणे अवघड जाते हे खरे. कारण ज्ञानेश्वरीत यादवकाळात प्रचलित असलेले शब्द व विधानांची वळणे आहेत. विजय पांढरे यांनी ज्ञानेश्वरीचे हृदगत नीट सांभाळून प्रचलित मराठीत आणले आहे व ते बरेच सुबोध झाले आहे. भाषा-भाषांमधील प्रवास चांगल्या वाटाड्याच्या सहाय्याने अर्थाला निर्वेधपणे करता येतो.

श्री. पांढरे यांचे निर्वाहाचे क्षेत्र वेगळे आहे, तरी ज्ञानेश्वरांनी त्यांना वेड लावले. त्यामुळे रूपांतराच्या निमित्ताने एका लोकोत्तर साक्षात्कारी संतांच्या योगयुक्त वाणीच्या मनोमय सान्निध्यात त्यांना काही काळ घालवता आला. त्यामुळे उरलेल्या आयुष्याची पाऊलवाट सोन्याची झाल्याची कृतकृत्यता त्यांना मिळेल. संतांचा एवढा प्रसादही पूर्वसंचितामुळेच लाभू शकतो, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

मा. राम शेवाळकर, नागपूर

esahity@gmail.com
ई-साहित्य प्रतिष्ठान®
www.esahity.com

श्री विजय पांढरे यांची ओळख

श्री विजय बळवंत पांढरे (BE Civil) हे मुख्य अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, (M.E.R.I.), नाशिक येथे अधीक्षक अभियंता व सहसंचालक या पदावर कार्यरत असून त्यांनी चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, भगवद्गीता व ज्ञानेश्वरी या चारही ग्रंथांचे आधुनिक प्रचलीत मराठीत सुलभ असे ओवीबद्ध रुपांतर केले अनुवाद केले आहेत. सदर ओवीबद्ध ग्रंथ ऑडिओ स्वरुपात व छापील स्वरूपातही उपलब्ध आहेत. त्यांनी नुकतीच अष्टावक्रगीताही आजच्या मराठीत ओवीबद्ध केली आहे. अध्यात्म हा चित्तस्थिरीकरणाचा , चित्तशुद्धीचा व चित्तलयाचा विषय असल्याचे या सर्व ग्रंथातून त्यांनी स्पष्टपणे मांडले आहे. सर्व धर्म, सर्व मार्ग, सर्व साधना, सर्व गुरू, सर्व ग्रंथ या सगळ्यांचे सार तेच आहे. सर्वांनी असा शास्त्रीय दृष्टीकोन बाळगल्यास आत्मज्ञान दूर नाही असे ते स्वानुभवावर सांगतात. (दूरभाष : ९८२२९९२५७८)

ई साहित्य प्रतिष्ठान

२००८ पासून मराठी ई पुस्तकांच्या निर्मितीत आणि वितरणात महत्त्वाचा वाटा ई साहित्य प्रतिष्ठानने उचलला आहे. आजवर २०० हून अधिक ई पुस्तकांची निर्मिती करणाऱ्या ई साहित्य प्रतिष्ठानचे आजघडीला सव्वा लाख वाचक आहेत. या सर्व वाचकांपर्यंत ही ई पुस्तके विनामूल्य वितरित केली जातात.

विनामूल्य ई पुस्तकांसाठी मेल पाठवा : esahity@gmail.com

अधिक माहिती साठी भेट द्या : www.esahity.com

फ़ोन : ९८६९६७४८२०